
S. A. P. D. J. Pathashala's
WALCHAND INSTITUTE OF TECHNOLOGY, SOLAPUR
Global Alumni Meet
December, 5th 2015
Seattle, U.S.A.


S. A. P. D. J. Pathashala's
WALCHAND INSTITUTE OF TECHNOLOGY, SOLAPUR
Global Alumni Meet


OPEN




अमेरिकेच्या सियालकोट शहरात सोलापूरच्या डब्ल्यूआयटीचे माजी विद्यार्थी प्रा.डॉ. अनघा कुलकर्णी यांच्या समवेत घेतलेले छायाचित्र.

# डब्ल्यूआयटीच्या अमेरिकेतील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

## • अभियांत्रिकी क्षेत्रातील संशोधनाला अधिक बळ : हलकुडे

सोलापूर - सोलापूरच्या वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (डब्ल्यूआयटी)चे सुमारे दोन हजाराहून अधिक विद्यार्थी सध्या अमेरिकेच्या विविध प्रांतामध्ये विविध कंपन्यांमधून उच्च पदांवर कार्यरत आहेत. त्यातील वॉशिंग्टन प्रांतातील सियाटेल शहरात असणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा ५ डिसेंबरला पार पडला.

डब्ल्यूआयटीच्या प्रा. डॉ. अनघा कुलकर्णी यांनी हा अमेरिकेच्या भूमिवर पहिला माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित केला होता. यावेळी अॅमेझॉन कार्पोरेशन, मायक्रोसॉफ्ट कार्पोरेशन अशा मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये उच्च पदावर कार्यरत असलेले आणि वॉशिंग्टन विद्यापीठात उच्च शिक्षण घेत असलेले डब्ल्यूआयटीचे प्रवण कुलकर्णी, अस्मिता कुलकर्णी, रेश्मा शहा, सुशांत मंत्री, अर्चना ढेरे, मोहना मोडक (बहिरंगी), प्रविण कैरमकोंडा या सोलापूरच्या विद्यार्थ्यांसह अन्य विविध शहरातील व राज्यातील प्रा. सुलगावकर, झिशान सय्यद असे १७ विद्यार्थी या सियाटेलच्या मेळाव्यास उपस्थित होते.

डब्ल्यूआयटीचे प्राचार्य डॉ. शशिकांत हलकुडे यांनी या विद्यार्थ्यांशी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. यावेळी त्यांनी जागतिक उच्च शिक्षणाच्या बदलत्या समीकरणाला अनुसरून डब्ल्यूआयटीदेखील आपल्यामध्ये आमूलाग्र बदल करीत आहे. त्याचे फलित म्हणून नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रीडेशनचे दोनवेळा मानांकन मिळाले असल्याचे सांगितले. तसेच एआयसीटीई आणि सीआयआयच्या देशव्यापी सर्वेक्षणानंतर २०१३ आणि २०१४ चा बेस्ट इंडस्ट्रीयल इन्स्टिट्यूटचा अॅवॉर्ड महाविद्यालयास मिळाल्याचेही या विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच महाविद्यालयात व्हर्च्युअल लर्निंग, वेबीनार आदी नवनवीन बदलत्या तंत्रज्ञानाबाबत डब्ल्यूआयटीचे प्राध्यापक व विद्यार्थ्यांना जगभरातील विषयनिहाय तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळत असल्याचे सांगितले.

ही सर्व माहिती ऐकून आणि डब्ल्यूआयटीने केलेली प्रगती लक्षणीय असल्याच्या प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी नोंदविल्या. तसेच या विद्यार्थ्यांनी व्हर्च्युअल क्लास, कटिंग एज टेक्नॉलॉजी व अभियांत्रिकी उच्च शिक्षणासाठी आवश्यक त्या मदतीसह सहभाग देण्याचे अभिवचन या विद्यार्थ्यांनी दिले.

या मेळाव्याचे यश म्हणून डब्ल्यूआयटीच्या रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेलसाठी माजी विद्यार्थ्यांकडून योगदान मिळण्याची अपेक्षा वाढलेली आहे. तसेच महाविद्यालयाच्या रिसर्च प्रोजेक्टमधील सुरू असलेल्या कामात या माजी विद्यार्थ्यांच्या ग्लोबल आयडीयाज या विद्यार्थ्यांना आता मिळत राहणार आहेत. तसेच डब्ल्यूआयटीचे नेटवर्क आता जागतिक पातळीवर वाढत राहणार असे आणि अभियांत्रिकी संशोधनाला बळ मिळणार आहे. अद्यावत ज्ञानासाठी विचारांच्या आदानप्रदानाची आवश्यकता आहे. त्यासाठी डब्ल्यूआयटीच्या अल्युमनाई चाप्टरच्या माध्यमातून व्यापक व्यासपीठही उपलब्ध होण्याची आशा वाढली असल्याचेही प्राचार्य हलकुडे यांनी म्हटले आहे.

अमेरिकेच्या सियालकोट शहरातील हा मेळावा यशस्वी करण्यासाठी वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, खजिनदार भूषण शहा, पृथ्वीराज गांधी, पराग शहा यांचे मार्गदर्शन लाभले.




# डब्ल्यू.आय.टी.च्या माजी विद्यार्थ्यांचा पहिला जागतिक मेळावा यशस्वी

शहर संचार

सोलापूर, दि. ८– वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर (डब्ल्यू.आय.टी.)चे दोन हजारांहून अधिक माजी विद्यार्थी अमेरिकेच्या विविध प्रांतात विविध शहरात विविध कंपन्यांमध्ये उच्चपदस्थांवर कार्यरत आहेत. या माजी विद्यार्थ्यांचा अमेरिकेच्या वॉशिंग्टन प्रांतातील सियाटेल शहरात पहिला जागतिक मेळावा जुन्या आठवणींना उजाळ देत आनंदमयी वातावरणात पार पडला.

अमॅझॉन कॉर्पोरेशन, मायक्रोसॉफ्ट कार्पोरेशन अशा मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये उच्चपदस्थ कार्यरत असलेले आणि वॉशिंग्टन विद्यापीठात उच्च शिक्षण घेत असलेले डब्ल्यू.आय.टी.चे प्रणव कुलकर्णी, अस्मिता कुलकर्णी, रेश्मा शहा, सुशांत मंत्री, अर्चना ढेरे, मोहना मोडक (बहिरंगी), प्रवीण कैरमकोंडा या सोलापूरच्या विद्यार्थ्यांसह अन्य विविध शहरातील व राज्यातील प्रा. सुलगावकर, झिशन सय्यद असे १७ विद्यार्थी मेळाव्यास उपस्थित होते. डब्ल्यू.आय.टी.च्या प्रा. डॉ. अनघा कुलकर्णी यांनी हा अमेरिकेच्या भूमीवर पहिला माजी विद्यार्थ्यांचा विदेशी मेळावा आयोजित करून कॉलेजची भूमिका स्पष्ट केली. व्हीडीओ. कॉन्फरन्सद्वारे प्राचार्य डॉ. शशिकांत हलकुडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. जागतिक उच्च शिक्षणाच्या बदलत्या समीकरणाला अनुसरून डब्ल्यू.आय.टी. देखील आपल्यामध्ये अमूलाग्र बदल करीत आहे. त्याचे फलितरूप म्हणून नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रिडिटेशनचे दोनवेळा मानांकन मिळाले आहे. ए.आय.सी.टी.ई. आणि सी.आय.आय.च्या देशव्यापी सर्वेक्षणानंतर २०१३ व २०१४ चा बेस्ट इंडस्ट्रीयल इन्स्टिट्यूटचा अॅवॉर्ड मिळाला आहे. शिक्षण आणि संशोधनाला चालना मिळण्यासाठी इंडो यू. एस. कॉन्फिडरेशन ऑफ इंजिनिअरिंगच्या माध्यमातूनही तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळते. एकंदरीत जगातील ज्ञान एकत्रित करून विद्यार्थ्याला जागतिक स्पर्धेतील आव्हाने पेलविण्यासक्षम आणि त्याला रोजगार सक्षम बनविण्याच्या उद्देशाने डब्ल्यू.आय.टी.मध्ये अनेक उपक्रमे राबविले जातात. ही माहिती ऐकून माजी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिक्रिया नोंदविल्या, तसेच व्हर्च्यूअल क्लास, कटिंग एज टेक्नॉलॉजी व अभियांत्रिकी उच्च शिक्षणासाठी आवश्यक त्या मदतीसह सहभाग देण्याचे अभिवचन दिले.

या मेळाव्याचे यश म्हणजे डब्ल्यू.आय.टी.च्या रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट सेलसाठी माजी विद्यार्थ्यांकडून योगदान मिळण्याची अपेक्षा वाढलेली आहे. डब्ल्यू.आय.टी.च्या अनेक रिसर्च प्रोजेक्टवरील सुरू असलेल्या कामात माजी विद्यार्थ्यांच्या नवनवीन 'ग्लोबल आयडीज' आजी विद्यार्थ्यांना मिळत राहणार आहेत. डब्ल्यू.आय.टी.चे नेटवर्क यापूर्वीच जागतिक पातळीवर वाढलेले आहे. अशा मेळाव्यांमुळे या नेटवर्कमध्ये एक जिव्हाळा येऊन खऱ्याअर्थाने अभियांत्रिकी संशोधनाला बळ मिळणार आहे. आधुनिक ज्ञानासाठी विचारांच्या आदानप्रदानाची आवश्यकता आहे, त्यासाठी डब्ल्यू.आय.टी.च्या 'अल्युम्नाई चाप्टर'च्या माध्यमातून व्यापक व्यासपीठ मिळण्याची अकांक्षा या मेळाव्याच्या माध्यमातून वाढलेली आहे.

मेळावा यशस्वी करण्यासाठी वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, खजिनदार भूषण शहा, पृथ्वीराज गांधी, पराग शहा यांचे मार्गदर्शन लाभले